क्षेत्र पूर्ती

१० J

५१

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ बाबत
प्राप्त होणाऱ्या पत्रांच्या तसेच अहवालाच्या अनावश्यक
प्रतींबाबत सूचना

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्र. केंमाअ-२००८/१२६४/प्र.क्र.४३७/०८/महा,
दिनांक : १३/५/२००९

परिपत्रक :-

राज्यामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ दिनांक १२ ऑक्टोबर, २००५ अंमलात आला आहे. हा अधिनियम केंद्राचा असून या अधिनियमाच्या अंमलबजावणीचे समन्वयन/संनियंत्रण करण्याच्या दृष्टीने सर्व मंत्रालयीन विभागांकडून विविध नियमकालिक/प्रासंगिक अहवाल या विभागामार्फत मागविले जातात. सर्व क्षेत्रिय कार्यालयांनी विहित पद्धतीनुसार त्यांची माहिती संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडे पाठविणे व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी ती संकलित स्वरुपात या विभागास पाठविणे आवश्यक आहे. या व्यतिरिक्त, कलम-६ अंतर्गत सार्वजनिक प्राधिकरणाकडे प्राप्त होणारे अर्ज त्यांनी त्यांच्या स्तरावरच निकाली काढणे आवश्यक आहे. मात्र शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, बऱ्याच क्षेत्रिय कार्यालयांकडून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ बाबतचे विविध अहवाल व पत्रांच्या प्रती अनावश्यकरित्या सामान्य प्रशासन विभागास पृष्ठांकित केल्या जातात. त्यामुळे मनुष्यबळ, स्टेशनरी, कार्यालयीन वेळ तसेच, टपाल खर्च इत्यादी उपलब्ध मर्यादित संसाधनांवर अनावश्यक ताण पडतो. त्याचप्रमाणे शासनाकडे अनावश्यकरित्या प्राप्त होणाऱ्या पत्रव्यवहारामुळे महत्वाच्या टपालाकडे दुर्लक्ष होऊ शकते.

सबब, या विभागामार्फत विनिर्दिष्टपणे मागविण्यात येणाऱ्या अहवालांव्यतिरिक्त, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ बाबतचे अहवाल तसेच पत्रव्यवहाराच्या प्रती या विभागास अनावश्यकरित्या पाठविण्यात येणार नाहीत, याची सर्व क्षेत्रिय कार्यालयांनी दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

न.म.शिंदे
अवर सचिव, महाराष्ट्र शासन